RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - १८ ] गुरुवार ते बुधवार, मे ६ - १२, २०२१ / वैशाख १६ - २२, शके १९४३ [ पृष्ठे ०८

## प्राधिकृत प्रकाशन

## संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### जिल्हाधिकारी यांजकडून

*भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ नुसार प्राथमिक अधिसूचना.*

**जिल्हा जळगाव**

क्रमांक भूसंपादन/मौजे भागपूर/एसआर-२३८/सन २०१८.– ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ‘‘उक्त अधिसूचना’’ असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड-ए)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश ‘‘उक्त जमिनी’’ असा करण्यात आला आहे) उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश ‘‘उक्त सार्वजनिक प्रयोजन’’ असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबतच्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींनुसार याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत ; (विस्थापन होणार नसेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे. भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६ *(२)* च्या परंतुकाअन्वये ज्या सिंचन प्रकल्पांना पर्यावरण परिणाम निर्धारण अहवाल त्या-त्या वेळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, आवश्यक असेल, अशा प्रकल्पासाठी या अधिनियमान्वये विहित सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

भागपूर, तालुका जळगाव येथील उपसा सिंचन योजनेचा बुडीत क्षेत्राचा संपादन करावयाच्या गृहचा प्रस्तावाकरिता संपादन या प्रकल्पास पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील पत्र, दिनांक ३ ऑक्टोबर २००२ अन्वये पर्यावरण विषयक परवानगी प्राप्त आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल करण्याची आवश्यकता नाही.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे;

(नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(४)* नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनींवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनींच्या अथवा त्याच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून, अशा मालकास उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार, जिल्हाधिकारी, जळगाव, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप-नियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेख्याच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी विशेष भूसंपादन अधिकारी (१), अप्पर तापी प्रकल्प (हतनूर), जळगाव यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक (खाजगी)**

**भागपूर, तालुका जळगाव येथील उपसा सिंचन योजनेचा बुडीत क्षेत्राचा संपादन करावयाच्या गृहचा मूळ संपादन प्रस्ताव**

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | | एकूण क्षेत्रफळ चौ. मी. | संपादन होणारे क्षेत्र | उरलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
| १ | १ | बखळ जागा | .. | ८२.०० | ८२.०० | ० |
| २ | २ | अर्धा भागात पक्के बांधकाम | .. | ६७.०० | ६७.०० | ० |
| ३ | ३ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ५९.०० | ५९.०० | ० |
| ४ | ४ | खुल्या जागेत बकऱ्याची झोपडी | .. | ८३.०० | ८३.०० | ० |
| ५ | ५ | बखळ जागा | .. | ८३.०० | ८३.०० | ० |
| ६ | ६ | बखळ जागा | .. | २५१.०० | २५१.०० | ० |
| ७ | ७ | बखळ जागा | .. | २५१.०० | २५१.०० | ० |
| ८ | ८ | बखळ जागा | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ९ | ९ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २६.०० | २६.०० | ० |
| १० | १० | कच्चे मातीची झोपडी अंगणामध्ये पत्राशेड | .. | ५१.०० | ५१.०० | ० |

**अनुसूची--***चालू*

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | | एकूण क्षेत्रफळ चौ. मी. | संपादन होणारे क्षेत्र | उरलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
| ११ | ११ | बखळ जागा | .. | ५३.०० | ५३.०० | ० |
| १२ | १२ | शाळेचे पक्के बांधकाम | .. | ८३.०० | ८३.०० | ० |
| १३ | १३ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| १४ | १४ | बखळ जागा | .. | ३८.०० | ३८.०० | ० |
| १५ | १५ | बखळ जागा | .. | २६.०० | २६.०० | ० |
| १६ | १६ | घरकुल पक्के बांधकाम | .. | १२३.०० | १२३.०० | ० |
| १७ | १७ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| १८ | १८ | बखळ जागा | .. | ८७.०० | ८७.०० | ० |
| १९ | १९ | बखळ जागा | .. | ४६.०० | ४६.०० | ० |
| २० | २० | बखळ जागा | .. | २१.०० | २१.०० | ० |
| २१ | २१ | बखळ जागा | .. | ६.०० | ६.०० | ० |
| २२ | २२ | बखळ जागा | .. | ५५.०० | ५५.०० | ० |
| २३ | २३ | बखळ जागा | .. | ५५.०० | ५५.०० | ० |
| २४ | २४ | बखळ जागा | .. | २८.०० | २८.०० | ० |
| २५ | २५ | बखळ जागा | .. | २८.०० | २८.०० | ० |
| २६ | २६ | बखळ जागा | .. | ७०.०० | ७०.०० | ० |
| २७ | २७अ | बखळ जागा | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| २८ | २७ब | बखळ जागा | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| २९ | २७क | बखळ जागा | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ३० | २७ड | बखळ जागा | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ३१ | २७ इ | बखळ जागा | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ३२ | २७ ई | बखळ जागा | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ३३ | २७ उ | बखळ जागा | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ३४ | २८ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| ३५ | २९ | बखळ जागा | .. | २१.०० | २१.०० | ० |
| ३६ | ३० | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ३७ | ३१ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २९.०० | २९.०० | ० |
| ३८ | ३२ | कच्चे बांधकाम / झोपडी | .. | ३८.०० | ३८.०० | ० |
| ३९ | ३३ अ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ४० | ३३ ब | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ४१ | ३४ | बखळ जागा | .. | १६.०० | १६.०० | ० |
| ४२ | ३५ | बखळ जागा | .. | १६.०० | १६.०० | ० |

**अनुसूची--*चालू***

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | | एकूण क्षेत्रफळ चौ. मी. | संपादन होणारे क्षेत्र | उरलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
| ४३ | ३६ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ४४ | ३७ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ४५ | ३८ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ४६ | ३९ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ४७ | ४० | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ४८ | ४१ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ४९ | ४२ | बखळ जागा | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५० | ४३ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५१ | ४४ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५२ | ४५ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५३ | ४६ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५४ | ४७ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५५ | ४८ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५६ | ४९ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५७ | ५० | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५८ | ५१ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ५९ | ५२ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ६० | ५३ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ६१ | ५४ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ६२ | ५५ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ६३ | ५६ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ६४ | ५७ | घरकुल पक्के बांधकाम | .. | ३१.०० | ३१.०० | ० |
| ६५ | ५८ | पक्के बांधकाम | .. | ६१.०० | ६१.०० | ० |
| ६६ | ५९ | पक्के बांधकाम | .. | ९.०० | ९.०० | ० |
| ६७ | ६०अ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ६८ | ६०ब | बखळ जागा | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ६९ | ६१ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| ७० | ६२ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| ७१ | ६३ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| ७२ | ६४ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| ७३ | ६५ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| ७४ | ६६ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| ७५ | ६७ | बखळ जागा | .. | ३७.०० | ३७.०० | ० |

**अनुसूची--**_चालू_

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | | एकूण क्षेत्रफळ चौ. मी. | संपादन होणारे क्षेत्र | उरलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
| ७६ | ६८ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ७७ | ६९ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ७८ | ७० | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ७९ | ७१ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ८० | ७२ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ८१ | ७३ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ८२ | ७४ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ८३ | ७५ | घरकुल पक्के बांधकाम | .. | २५.०० | २५.०० | ० |
| ८४ | ७६ | पक्के आर.सी.सी. बांधकाम | .. | ३७.०० | ३७.०० | ० |
| | | **एकूण** | .. | **३४९३** | | |

**गावठाणातील नमुना नंबर ८ मध्ये नोंद नसलेले अतिक्रमित झोपड्या घरे**

| अ. क्र. | अतिक्रमित धारकाचे नाव | | अतिक्रमित जागेचे क्षेत्रफळ | संपादन होणारे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| १ | श्री. ईश्वर सुधाकर पवार | .. | १२.२५ | १२.२५ |
| २ | श्री. रविकांत मधुकर पवार | .. | १२.२५ | १२.२५ |
| ३ | श्री. मानसिंग रतन पवार | .. | ३०.०० | ३०.०० |
| ४ | श्री. समाधान कैलास गायकवाड | .. | १९.२५ | १९.२५ |
| ५ | श्री. सुनिल कैलास गायकवाड | .. | २१.०० | २१.०० |
| ६ | श्री. दिलीप रतन पवार | .. | ४५.०० | ४५.०० |
| ७ | श्री. मंगल पितांबर बागडे | .. | १७.७५ | १७.७५ |
| ८ | श्री. प्रमोद कैलास गायकवाड | .. | २०.०० | २०.०० |
| ९ | श्री. लक्ष्मण सुकदेव बागडे | .. | २७.०० | २७.०० |
| १० | श्री. ईश्वर फुलसिंग बागडे | .. | ३०.०० | ३०.०० |
| ११ | श्रीमती यमुनाबाई शालीक सोनवणे | .. | १६.०० | १६.०० |
| १२ | श्री. अरुण अशोक मोरे | .. | ३५.०० | ३५.०० |
| १३ | श्री. बापू जगन भिल | .. | २५.०० | २५.०० |
| १४ | श्री. अनिल अशोक बागडे | .. | २५.०० | २५.०० |
| १५ | श्री. विजय राजू मोरे | .. | ७२.०० | ७२.०० |
| १६ | श्री. चंद्रकांत माणिक बागडे | .. | २५.०० | २५.०० |
| १७ | श्रीमती द्वारकाबाई भास्कर पवार | .. | ५०.०० | ५०.०० |
| १८ | श्री. प्रकाश ओंकार मालचे | .. | ३०.०० | ३०.०० |

**अनुसूची--***चालू*

| अ. क्र. | अतिक्रमित धारकाचे नाव | | अतिक्रमित जागेचे क्षेत्रफळ | संपादन होणारे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| १९ | श्री. अंकुश लक्ष्मण गायकवाड | .. | ४२.०० | ४२.०० |
| २० | श्री. अरुण चंद्रकांत गायकवाड | .. | २०.०० | २०.०० |
| २१ | श्री. दयाराम तुकाराम पवार | .. | २८.०० | २८.०० |
| २२ | श्री. रमेश सुरेश गायकवाड | .. | १२.०० | १२.०० |
| २३ | श्री. रघुनाथ अशोक बागडे | .. | ३६.०० | ३६.०० |
| २४ | श्री. रुपचंद हरचंद ठाकरे | .. | १६.०० | १६.०० |
| २५ | श्री. गोपाळ हरचंद ठाकरे | .. | १६.०० | १६.०० |
| २६ | श्री. बाळू गोपाळ ठाकरे | .. | १६.०० | १६.०० |
| २७ | श्रीमती उषाबाई राजू सोनवणे | .. | २४.०० | २४.०० |
| २८ | श्री. किशोर रविंद्र पवार | .. | २४.०० | २४.०० |
| २९ | श्री. शिवदास हिरामण पवार | .. | २८.०० | २८.०० |
| ३० | श्री. अरुण उत्तम गायकवाड | .. | ७०.०० | ७०.०० |
| ३१ | श्री. प्रताप रतन पवार | .. | २०.०० | २०.०० |
| ३२ | श्री. जगन नामदेव पवार | .. | २५.०० | २५.०० |
| ३३ | श्री. गोविंदा नामदेव पवार | .. | २०.०० | २०.०० |
| ३४ | श्री. विजय नथ्थू सोनवणे | .. | २५.०० | २५.०० |
| ३५ | श्रीमती लताबाई हिरामण पवार | .. | १८.०० | १८.०० |
| ३६ | श्री. विनोद कौतिक सोनवणे | .. | २४.०० | २४.०० |
| ३७ | भागपूर देवघर, मंदिर | .. | २५.०० | २५.०० |
| ३८ | झोपडी मालक ग्रामस्थांना माहित नाही | .. | ४०.०० | ४०.०० |
| ३९ | श्री. रामदास सोमा झाल्टे | .. | २०.०० | २०.०० |
| ४० | श्री. साहेबराव भगवान पवार | .. | १२.२५ | १२.२५ |
| ४१ | श्री. बाबुराव हरचंद पवार | .. | १६.०० | १६.०० |
| ४२ | श्री. शंकर काळू पवार | .. | २०.०० | २०.०० |
| ४३ | श्री. कृष्णा रमेश पवार | .. | २०.०० | २०.०० |
| ४४ | श्री. रोहित रविन्द्र पवार | .. | १२.०० | १२.०० |
| ४५ | श्री. झाहिल्या गेंदा बारेला | .. | १६.०० | १६.०० |
| ४६ | श्री. पितांबर रमेश पवार | .. | २०.०० | २०.०० |
| ४७ | श्री. जगर बिनेना बारेला | .. | १२.०० | १२.०० |
| ४८ | श्री. चेतन रमेश पवार | .. | २०.०० | २०.०० |
| ४९ | श्री. अक्षय रविंद्र पवार | .. | १६.०० | १६.०० |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : मौजे भागपूर, तालुका जळगाव, जिल्हा जळगाव येथील उपसा सिंचन योजनेचा बुडीत क्षेत्राचा संपादन करावयाच्या गृहचा मूळ संपादन प्रस्ताव.

**प्रकल्प कार्याचे वर्णन** : मौजे भागपूर, तालुका जळगाव, जिल्हा जळगाव येथील उपसा सिंचन योजना.

**समाजाला मिळणारे लाभ** : सिंचन.

**अनुसूची - तीन**

भागपूर गावाचे विस्थापन

**अनुसूची - चार**

**सामाजिक परिणाम निर्धारण सारांश**

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, चे कलम ६ (२) च्या परंतुकाअन्वये ज्या सिंचन प्रकल्पांना पर्यावरण परिणाम निर्धारण अहवाल त्या-त्या वेळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, आवश्यक असेल, अशा प्रकल्पांसाठी या अधिनियमान्वये विहित सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

मौजे भागपूर, तालुका जळगाव, जिल्हा जळगाव येथील उपसा सिंचन योजनेचा बुडीत क्षेत्राचा संपादन करावयाच्या गृहचा मूळ संपादन या प्रकल्पास पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील पत्र दिनांक ३ ऑक्टोबर २००२ अन्वये पर्यावरणविषयक परवानगी प्राप्त आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : अपर जिल्हाधिकारी, जळगाव.

**(ब)** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव.

**(क)** ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, दिनांक २९ जुलै २०२०.

**टीप**.–

प्रस्तावित संपादनाखालील उक्त घरांच्या आराखड्याचे कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, जळगाव व विशेष भूसंपादन अधिकारी (१) अपर तापी प्रकल्प (हतनूर), जळगाव यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**अभिजीत राऊत,**
जिल्हाधिकारी तथा समुचित प्रशासन,
जळगाव.

जळगाव, २२ एप्रिल २०२१.

## जिल्हादंडाधिकारी यांजकडून

**वाचले** : (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००७/४४०/प्र.क्र. १७४/२००७/५, दि. २५ जुलै २००७.

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००८/प्र.क्र. २७६/५, दि. २४ जुलै २००८.

(३) शासन शुध्दीपत्रक, क्र. विकाअ-२००९/प्र.क्र. २७६/५, दि. २४ जुलै २००८.

(४) सहायक कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांचे सन २०१३.

(५) पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडील पत्र क्र. जिविशा/चाप/१९५८/२०१८, दि. १५ मार्च २०१८.

**आदेश**

क्रमांक ड/कक्ष-३/एमएजी-२/कावि/५८४/सन २०२१.– उपोद्‌घातात नमूद १ व २ अन्वये सहायक कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांनी श्री. शिवदास चिंधा बोरसे, रा. ३२-अ, बिजलीनगर, गोंदुर रोड, देवपूर, तालुका जिल्हा धुळे यांना सन २०१३ या वर्षीचा ‘गुणवंत कामगार कल्याण’ पुरस्कार प्राप्त झाल्याने शासन निर्णयाप्रमाणे त्यांना ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ या पदावर नियुक्ती करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने उपोद्‌घातात नमूद १ व २ शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मी, दिलीप जगदाळे, जिल्हादंडाधिकारी, धुळे श्री. शिवदास चिंधा बोरसे, रा. ३२-अ, बिजलीनगर, गोंदुर रोड, देवपूर, तालुका जिल्हा धुळे यांना ही नियुक्ती सामान्यत: हा आदेश निर्गमित केल्याच्या तारखेपासून वयाच्या ७० वर्षांपर्यंत किंवा ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ या पदावर नियुक्तीसाठीच्या पात्रतेच्या अटीचा भंग करत नाहीत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील. तसेच राज्य शासनास ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ यांची ही नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील. ही मुदत संपताच किंवा ती त्यापूर्वीच संपुष्टात आणण्यात आल्यास ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ या पदासाठी प्राप्त झालेले सर्व साहित्य संबंधित पोलीस ठाणे किंवा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात तत्काळ परत करण्याची प्राथमिक जबाबदारी सर्वस्वी संबंधित ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ यांची राहील.
**विशेष कार्यकारी अधिकारी हे खालील कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम राहतील.**

(१) साक्षांकनाचे काम - साक्षांकनासाठी, पडताळणीसाठी किंवा यथास्थिती अधिप्रमाणनासाठी त्यांच्यापुढे आणलेल्या दस्तऐवजांचे साक्षांकन, पडताळणी किंवा अधिप्रमाणन करणे आणि राज्य शासनाने याबाबत काढलेल्या अनुदेशानुसार अशा दस्तऐवजांवर त्यांची विहित मोहोर उमटवणे व तारखेसह स्वाक्षरी करणे, स्वाक्षरी खाली स्वत:चे नाव लिहिणे.

(२) नियुक्त करण्यात आलेल्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना मोहोर उमटविण्यासाठी शिक्का नजीकच्या तहसीलदार यांजकडून उपलब्ध करुन घ्यावा. तसेच साक्षांकित केलेल्या कागदपत्रांची माहिती एका नोंदवहीत न चुकता नमूद करावी व ज्या वेळेत या नोंदवहीची अवलोकनासाठी संबंधित पोलीस अधीक्षक/जिल्हाधिकारी यांचेकडून मागणी केली जाईल त्यावेळी ती तत्काळ उपलब्ध करून देण्यात यावी.

(३) या आदेशाद्वारे नेमण्यात आलेल्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची, शांतता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यकतेनुसार त्या क्षेत्रातील मोहल्ला समिती/शांतता समितीवर पोलीस अधीक्षक/जिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी.

(४) या आदेशाद्वारे केलेल्या ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ यांची नियुक्ती मानसेवी असून त्यांना सोपविण्यात आलेल्या वरील कामांबाबत कोणतेही मानधन, वेतन किंवा भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

(५) प्रत्येक ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ यांनी आपल्या नियुक्तीची वैधता सुस्पष्टपणे दर्शविणारे प्रमाणपत्र आपल्या ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ पदाच्या कामाच्या जागी सर्वांना सहजपणे दिसेल अशा ठिकाणी लावावे व या कामासाठी येणाऱ्या व्यक्तीने मागणी केल्यास ते त्या व्यक्तीस दाखवावे.

(६) ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने घरावर, दुकानावर, कार्यालयावर स्वत:च्या नावासह ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ असा फलक लावावा. त्याच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत. तथापि त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर ‘विशेष कार्यकारी अधिकारी’ असा उल्लेख करू नये.

अटी व शर्तीचा भंग केल्यास सदर नियुक्ती तत्काळ रद्द करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

**दिलीप जगदाळे,**
जिल्हादंडाधिकारी, धुळे.

धुळे, ४ मार्च २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.